Today गोंदिया
सकाळ
शुक्रवार २४ ऑगस्ट २०१८


# हिवरा येथील कृषी विज्ञान केंद्रात गाजरगवत निर्मूलन सप्ताह

**गोंदिया, ता. २३ :** हिवरा येथील कृषी विज्ञान केंद्रात सद्भावनादिन तसेच गाजरगवत निर्मूलन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. एन. एस. देशमुख यांनी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या वेळी मानवता, बंधुता व सद्भावनेची शपथ उपस्थित कर्मचारी व शेतकरी यांना देण्यात आली. उत्पन्न दुप्पट करण्याच्या हेतूने शेतकऱ्यांनी जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय व जनावरांचे खाद्य व्यवस्थापन याविषयी प्रशिक्षण देण्यात आले. जातिवंत जनावरांची निवड करावी, कृत्रिम रेतन पद्धतीने जातिवंत जनावरे तयार करून त्यांच्यासाठी खाद्यदेखील घरी तयार केले तर जास्तीत जास्त लाभ मिळू शकतो, असेही देशमुख यांनी सांगितले. विषय विशेषज्ञ मनोज भोमटे यांनी गाजर गवतामुळे मानवी शरीरावर खाज येणे, शिंका येणे, ताप येणे असे लक्षणे दिसतात तसेच जनावरांच्या खाण्यात आले तर त्यांनादेखील ताप येतो. दुधाळ जनावरांनी हे गवत खाल्ले तर, दुधापासून मानवी शरीरास विषबाधा होऊ शकते, असे सांगत गाजर गवत फुलावर येण्याच्या आधी उपटून टाकावे किंवा २-४ डी या तणनाशकाची फवारणी करावी, असे सांगितले. आर. डी. चव्हाण यांनी धानावरील लष्करी अळी, खोडकिडा यांचे व्यवस्थापन कसे करावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. सविता पवार यांनी पिकाचे पाणी व्यवस्थापन विषयी मार्गदर्शन केले. प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश खेडीकर यांनी माती परीक्षण व अन्नद्रव्य व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सोमनाथ गवते, आर. पी. चव्हाण, राहुल पातुर्डे यांनी सहकार्य केले.



**गोंदिया : शेतकऱ्यांना गाजरगवताविषयी मार्गदर्शन करताना देशमुख.**